MHST060004702025

**<u>नि.दि.दा.क्र. २२१/२०२५ मधील निशाणी २२ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या अर्जातील कथनानुसार, प्रस्तुत दावा वाद मिळकतीचे वाटप व स्वतंत्र हिस्सा मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. दावा दाखल करण्यापूर्वीच प्रतिवादी क्र. ३ लक्ष्मीबाई विठ्ठल काळे यांचे निधन झाले होते. तथापि, त्यांचे नाव दाव्यामध्ये नजरचुकीने प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ लक्ष्मीबाई यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ व ५ हे आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावासमोर "मयत" असा उल्लेख करून, त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र. ४ व ५ यांची नोंद करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केवळ औपचारिक स्वरूपाची असून त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. म्हणून प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीने केली आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी ३१ अन्वये हरकत दाखल करुन सदर दुरुस्तीच्या निमित्ताने वादी दाव्याचे कामकाज लांबविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नमूद केले आहे. तसेच, अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादींना र.रु. २,०००/– खर्च देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्ज, त्यावरील हरकत तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. तसेच, उभय पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

०५. वादीने अर्जामध्ये नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही केवळ साधारण व औपचारिक स्वरूपाची दुरुस्ती असल्याचे दिसून येते. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात, कारणात किंवा मागितलेल्या दिलाशामध्ये कोणताही बदल होत नाही. उलट, प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास पक्षकारांमधील वास्तविक वादाचे प्रभावी, सर्वंकष व कायमस्वरूपी निराकरण करण्यास मदत होईल. त्यामुळे न्यायाच्या हितास्तव सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तथापि, दुरुस्ती करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादीवर खर्च लादणे आवश्यक आहे. परिणामी, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :–

**–: आ दे श :–**

१. वादीचा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला अर्ज र.रु. ५००/– प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीनी दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत अथवा त्यापूर्वी अभिलेखावर सादर करावी.

WAMAN DIGAMBAR JADHAV
Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.07.07 17:37:58 +0530

**(वामन. दि. जाधव)**

दि.०७/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दहिवडी.